**<u>कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना.....</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही -२०२० /प्र.क्र.३० /कार्या १२**
मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: **०७ जुलै २०२०**

**<u>वाचा :-</u>**

१) दि.२५.०५.२००६ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केलेला "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ "
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.०४ मे, २०२०

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रत्येक वर्षी एप्रिल व मे या महिन्यात सर्वसाधारण बदल्या करण्यात येतात. कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेवून वित्त विभागाने वरील संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयाव्दारे विविध उपाययोजना विहित केल्या आहेत. सदर शासन निर्णयाव्दारे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत मुद्दा क्र.१५ व्दारे असे विहित करण्यात आले आहे की, "कोरोना महामारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या विविध विभागांतर्गतच्या उपाययोजनांमध्ये सातत्य राखणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन चालू वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांची बदली करण्यात येऊ नये. "

यासंदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार, चालू वित्तीय वर्षात राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत सूचना देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात करावयाच्या बदल्यांसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे या शासन निर्णन्वये सूचित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्वसाधारण बदल्या प्रत्येक वर्षी एप्रिल व मे या महिन्यात करण्यात येतात. मात्र, प्रस्तावनेत नमूद केलेल्या पार्श्वभूमीवर चालू वित्तीय वर्षात दि.३१ मे २०२० पर्यंत

करावयाच्या सर्वसाधारण बदल्या या, दि.३१ जुलै २०२० पर्यंत त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदांच्या १५ टक्के एवढया मर्यादेत करण्यात याव्यात. सर्वसाधारण बदल्या या बदली अधिनियमातील कलम ६ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात याव्यात.

तसेच, सर्वसाधारण बदल्यांव्यतिरिक्त काही अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणामुळे बदल्या करावयाच्या असल्यास, अशा बदल्या देखील दि.३१ जुलै २०२० पर्यंत बदली अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन करण्यात याव्यात.

सदर आदेश वित्त विभागाने अनौ. सं.क्र.८७७/ सचिव (व्यय)/ दि.२६.६.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००७०७१६३७२९७४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2020.07.07 16:45:26 +05'30'

**(गीता रा. कुलकर्णी)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी,
११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१४. सामान्य प्रशासन विभाग/का. ३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता),
१५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
१६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१७. निवड नस्ती